पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑक्टोबर २०१९

## Appreciation Letter...

Dear Dr. Venkatesam,

Good Morning

Day before yesterday, I had to take my Mother in Law, aged 97+ and barely able to walk, to a doctor on Siddharth road off Max Mueller Bhavan road.

There was no parking on the side near the doctor. So I asked the traffic cop to allow me to park, which he willingly did. After taking her into the clinic I parked my car in the correct location.

After the doctors appointment was over, I brought my car to the earlier location. A traffic police constable's came there and graciously and politely helped to get her settled in. The police constable's name was 'Nana' and he joined the police after a stint in the army. He was later talking to his superior on the walky-talky and I talked to her to commend Nana for being what a policeman should be.

It is good to meet a policeman who cares. May there be many more "Nanas".

Thank you
Sincerely

# लोकाभिमुख उपक्रम

लोकाभिमुख उपक्रम

# हरवलेल्यांच्या शोधासाठी पोलिसांचा मिसिंग सेल



**पुणे : प्रतिनिधी**

हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी पुणे पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली असून, त्यासाठी खास 'मिसिंग सेल' सुरू केला आहे. या माध्यमातून पोलिस थेट तक्रारदारांशीच संवाद साधत असून, बेपत्ता व्यक्तींची माहिती घेत आहेत. आतापर्यंत १ हजार २१७ तक्रारदारांशी पोलिसांनी संवाद साधला आहे.

शहरातून साधारणत: वर्षाला १८ ते ६० वयोगटातील तीन हजार नागरिक बेपत्ता होतात. प्रथम कुटुंबच या व्यक्तींचा राहता परिसर, मूळ गाव; तसेच नातेवाईक आणि शेजारील शहरांमध्ये शोध घेते. मात्र, त्यात यश न आल्यास कुटुंब पोलिसाकडे जाते. बेपत्ता होणाऱ्यात पुरुषांचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी 'मिसींग सेल'च्या माध्यमातून गेल्या चार वर्षांपासून पोलिसांकडे असलेल्या बेपत्ता तक्रारींची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त बच्चन सिंह यांच्या देखरेखीखाली सामाजिक सुरक्षा विभागातील उपनिरीक्षक प्रिया टिळेकर व पथक काम करीत आहे.




मुलांना मार्गदर्शन करताना पोलिस आयुक्त.

# विधिसंघर्षित मुलांनी साजरी केली दिवाळी

**पुणे : प्रतिनिधी**

विशेष बालसुरक्षा पथक व पंख फाउंडेशनच्या वतीने पोलिस आयुक्तालयात विधिसंघर्षित मुलांसाठी खास दिवाळी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

हा मेळावा मंगळवार ते बुधवार असा दोन दिवस झाला. मेळाव्यात विधिसंघर्षित बालकांसह इतर मुले व पालकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

विधिसंघर्षित मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी शहराचे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी भरोसा सेलच्या माध्यमातून विशेष बालसुरक्षा पथकाची स्थापना केली. या वेळी या मुलांसाठी पणती रंगकाम, किल्ला बनविणे, वॉल पेंटिंग, आकाशकंदील बनविणे असे उपक्रम घेण्यात आले. गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंह यांनी मुलांना समुपदेशन केले. अनेक नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून मोफत प्रशिक्षणाची सोय करून देण्यात आली.

सध्या या उपक्रमाच्या माध्यमातून २७ मुले प्रशिक्षण घेत असून, इतर सात मुलांनी प्रशिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे. कार्यक्रमवेळी पोलिस आयुक्तांनी मुलांची आस्थेने चौकशी केली. त्यामुळे मुलांच्या पालकांनादेखील वेगळा दिलासा मिळाला. या वेळी मुलांना दिवाळी भेट व खाऊचे वाटप करण्यात आले.

हा मेळावा सह पोलिस आयुक्त डॉ. शिसवे, अपर पोलिस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक शिल्पा चव्हाण, पंख फाउंडेशनच्या अध्यक्ष स्मिता आपटे यांनी पार पाडला.

पुढारी – दि. १८ ऑक्टोबर, २०१९

# पोलिस आयुक्तांची गुन्हेगारी 'सफाई' मोहीम सुरू

पुणे : देवेंद्र जैन



शहरात घडत असलेल्या अनेक गंभीर गुन्ह्यांचा तपास जलद होण्यासाठी, असामाजिक तत्त्वे, गुन्हेगार यांच्यावर वचक बसविण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी पोलिसांकरिता 'सफाई' प्रकल्प सुरू केला आहे. त्यामुळे सर्व बेकायदेशीर धंद्यांचे समूळ उच्चाटन होणार आहे.

- सर्व बेकायदेशीर धंद्यांचे समूळ उच्चाटन करणार
- अभिलेखावरील गुन्हेगारांचे आता काही खरे नाही
- समाज माध्यमांचा केला जाणार मोठा वापर

वेंकटेशम यांनी शहरातील गुन्हेगारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी मंगळवारपासून 'सफाई' अभियान ( सर्व्हेलन्स अँड प्रिव्हेंशन ऑफ अँटी सोशल अँड इल लिगल ॲक्टीव्हीजेस) असामाजिक तत्त्व व कृत्ये करणाऱ्यांवर प्रतिबंध व देखरेख, हा प्रकल्प सुरू केला आहे. याची अनेक उद्दिष्टे आहेत. त्यामध्ये प्रत्येक पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आयुक्तालयाच्या हद्दीतील अवैध धंदे व बेकायदेशीर व्यवसायांना प्रतिबंध करून त्याचे समूळ उच्चाटन करावयाचे आहे, तसेच या संदर्भातील गुन्हे अभिलेखावर नोंद असलेल्या गुन्हेगारांवर वचक निर्माण करावयाचा आहे.

दै. 'पुढारी'शी बोलताना वेंकटेशम यांनी या प्रकल्पाच्या कमांडिंग अधिकाऱ्यांच्या कर्तव्याबाबत माहिती दिली. त्यानुसार यापुढे अवैध धंदेचालक अथवा मालक यांची वर्गवारीनुसार यादी करून व या धंद्यांची ठिकाणे शोधून सर्व माहिती परिमंडळीय पोलिस ठाण्यानुसार एकत्रित करून, संगणकामध्ये भरून, जतन करावयाची आहे. तसेच गुन्हेगारांच्या वर्गवारीनुसार माहिती रोज सकाळी ११ च्या आत सहायक पोलिस आयुक्त प्रतिबंधक विभाग यांना व संबंधित व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवून त्याबाबत तपासणी करून तपासणी अहवाल त्वरित सादर करावयाचा आहे. तसेच उपलब्ध माहिती ही संगणकामध्ये जतन करून त्याचा सर्व वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करायचा आहे. नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास वाढावा व नागरिक न घाबरता तक्रार करण्यास पुढे यावे व त्यांना योग्य तो न्याय मिळण्यास मदत होईल, त्याकरिता मी स्वत: यावर लक्ष ठेवून असल्याचे वेंकटेशम यांनी सांगितले.

वेंकटेशम यांनी आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यापासून शहरातील नागरिकांची सुरक्षा व पोलिसदलाच्या सक्षमीकरणाकरिता अनेक चांगले प्रकल्प सुरू केले आहेत. याची सुरुवात त्यांनी आयुक्त कार्यालयाच्या नूतनीकरणापासून केली आहे. कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना बसण्याची सुविधा नव्हती. म्हणून त्यांनी त्यांच्या कार्यालयाशेजारचा परवाना विभाग इतरत्र हलवून, नागरिकांना बसण्यासाठी जवळपास हजार फुटांचे वातानुकूलित दालन सुरू केले. येथे सर्व प्रकारच्या आवश्यक सुविधा सुरू करण्यात आल्या आहेत. गुन्हे शाखेच्या अनेक पथकांची कार्यालये ब्रिटिश काळातील आहेत. त्याकरिता गुन्हे शाखेची स्वतंत्र इमारत शहरातील एक मोठा बांधकाम व्यावसायिक बांधत आहे. लवकरच गुन्हे शाखेचे आधुनिक कार्यालय सुरू होणार आहे, त्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग व महापालिकेने सर्व नकाशे मंजूर करून जोरात काम सुरू आहे.

वाहतूक शाखेचे कार्यालय शहराबाहेर म्हणजेत येरवडा कारागृहाजवळ हलवून या कार्यालयाच्या जुन्या जागेवर ज्येष्ठ नागरिकांकरिता 'भरोसा सेल' सुरू करण्यात आला आहे. आयुक्तालयात येणाऱ्यांचे स्वागत पुणेरी पाट्यांनी होत असल्यामुळे नागरिक त्या वाचून बोध घेत आहेत. नागरिकांच्या सुरक्षेकरिता अत्याधुनिक वाहने, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत.

शहराची लोकसंख्या जवळपास ५० लाखांपर्यंत पोहोचली आहे व शहराचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असल्याने वेंकटेशम यांनी नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी पोलिसांना आदेश दिले आहेत व त्या तक्रारींचा पाठपुरावा थेट पोलिस आयुक्तालयातून घेतला जात आहे.

# पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे मतदान शांततेत

पुणे : प्रतिनिधी

अगदी शेवटच्या बूथपर्यंत केलेली आखणी आणि पोलिस कर्मचारी ते अतिवरिष्ठांच्या प्रयत्न; तसेच एकजुटीने केलेल्या कामांमुळे मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली आहे, अशी प्रतिक्रिया पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी मतदान पार पडल्यानंतर व्यक्त केली.

विधानसभा मतदानासाठी शहरात दहा हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. शहरात शंभर संवेदनशील इमारतीवर विशेष बंदोबस्ताची आखणी केली होती. शहरात २ हजार ९२० बूथ होते. संवेदनशील बूथवर अतिरिक्त कर्मचारी तैनात होते. या सर्व बंदोबस्तावर सहपोलिस आयुक्त रवींद्र शिसवे व अप्पर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांचे देखरेख होती. तर अनुचित प्रकार घडल्यानंतर त्यासाठी वेगळी पथकेही तैनात करण्यात आली होती. दुसरीकडे गुन्हे शाखेने सराईतांवर नजर ठेवली होती. दिवसभरात अनेक गुन्हेगारांना ताब्यात घेण्यात आले होते.

मतदानाचा दिवस शांततेत आणि सुरळीत पार पडला. होमगार्ड, पोलिस कर्मचारी ते अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांच्या एकजुटीने हे शक्य झाले असून, आजचा दिवस यशस्वीरीत्या पार पडला आहे. शेवटच्या बूथपर्यंत मायक्रो लेवल बंदोबस्ताची केलेली आखणी आणि वेगवेगळ्या उपाययोजनांमुळे कोठेही अनुचित प्रकार घडला नाही. मतदारांनाही त्रास झाला नाही, असे पोलिस आयुक्त व्यंकटेशम यांनी सांगितले.

## १ हजार ८०० होमगार्ड परराज्यांतील

शहरात पुणे पोलिसांना बंदोबस्तासाठी बाहेरून १ हजार ८०० होमगार्ड मिळाले होते. त्यातील जवळपास ८० टक्के होमगार्ड हे कर्नाटक व इतर राज्यांतील येथील होते. तत्पूर्वी बंदोबस्तामुळे होमगार्ड यांना मतदान करता आले नाही, असा मेसेज व्हायरल झाला होता. त्यावर आयुक्तांनी होमगार्ड परराज्यातील होते. त्यामुळे त्यांना मतदान नव्हते, असे सांगितले.

## त्या महिला पोलिस कर्मचाऱ्याचे आयुक्तांनी केले कौतुक

एक राजकीय व्यक्ती काही कार्यकर्त्यांना घेऊन केंद्रात जात होती. परंतु प्रवेशद्वारावरील पोलिस कर्मचारी आदिती भैरट यांनी त्यांना अडविले. आतमध्ये जाता येणार नाही, असे सांगितले. त्यावेळी त्या व्यक्तीने मतदान केंद्रात जाण्याचा अधिकार असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारा, असे भैरट यांना सांगत आत जाण्याचा प्रयत्न केला. पण भैरट यांनी त्यांना आत न जाऊ देता थेट पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांना फोन करून नियमांची खात्री केली. त्यांना आत प्रवेश दिला नाही. पोलिस आयुक्तांनी भैरट यांच्या कामाचे कौतुक केले.

सकाळ – दि. १७ ऑक्टोबर, २०१९

# बालगुन्हेगारांच्या कलेचे कौतुक

## विविध वस्तू पाहून पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम भारावले

पुणे, ता. १६ : केव्हातरी हातून घडलेल्या एखाद्या चुकीच्या घटनेमुळे बालगुन्हेगारांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला. पोलिसांनी त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. तेवढ्यावरच न थांबता त्यांच्यासाठी खास दिवाळी मेळावाही आयोजित केला. पोलिस आयुक्तांनी या मुलांच्या कलेचे भरभरून कौतुक करीत त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

विविध प्रकारच्या गुन्ह्यांतील बालके व त्यांच्या पालकांसाठी पुणे पोलिसांच्या 'भरोसा सेल'च्या वतीने पोलिस आयुक्तालयामध्ये

> बालगुन्हेगार व गुन्ह्यांमधील पीडित बालकांसाठी आयोजित केलेला दिवाळी मेळावा आनंदोत्सवात पार पडला. त्यांच्या पालकांनीही आवर्जून हजेरी लावली. भरोसा सेलच्या समुपदेशनामुळे अनेक बालके गुन्हेगारीतून बाहेर पडत आहेत.
>
> – शिल्पा चव्हाण, पोलिस निरीक्षक

दोनदिवसीय दिवाळी मेळावा आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी मुलांनी रंगीबिरंगी कंदील तयार केले. भिंतींवर त्यांना आवडणारी तितकीच देखणी चित्रे काढली, पणत्या रंगविल्या. या कलाकृती पाहून पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम भारावून गेले. मुलांनी काय-काय तयार केले आहे, याची माहिती त्यांनी घेतली. तसेच, मुलांना दिवाळीचा फराळ, भेटवस्तू देऊन डॉ. वेंकटेशम यांनी त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली.

या कार्यक्रमासाठी पंख संस्थेच्या संचालिका स्मिता आपटे, बालक सेलच्या प्रमुख पोलिस निरीक्षक शिल्पा चव्हाण उपस्थित होत्या. या वेळी मुलांच्या पालकांचेही उपस्थितांनी कौतुक करीत त्यांना प्रोत्साहन दिले.

सकाळ – दि. २२ ऑक्टोबर, २०१९

# 'योग्य नियोजनाने निवडणूक शांततेत'

**पुणे, ता. २१ :** मागील एक महिन्यापासून सुरू असलेली गुन्हेगारांवरील प्रतिबंधात्मक कारवाई व मुसळधार पावसातही पोलिस कर्मचाऱ्यांपासून ते पोलिस सहआयुक्त यांच्यापर्यंतच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कष्ट घेतले. तसेच मनुष्यबळाचे सूक्ष्म नियोजन आणि सांघिक प्रयत्नामुळे सोमवारी (ता. २१) शहरातील निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली, असे पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी सांगितले.

विधानसभा मनतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी पुणे पोलिसांकडून दहा हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रविवारी (ता. २०) सकाळपासून शहरातील सर्व मतदानकेंद्रांवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता.

**पोलिस कर्मचाऱ्यापासून ते पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, होमगार्ड, राज्य राखीव पोलिस दल, पॅरामिलिटरी फोर्स या सगळ्यांनी सांघिक काम केले. विशेषतः गुन्हे शाखेच्या पथकाने महिनाभर प्रतिबंधात्मक कारवाई केली. त्यामुळे निवडणुकीत कुठलीही अनुचित घटना घडली नाही.**

**– डॉ. के. वेंकटेशम,** पोलिस आयुक्त, पुणे

शनिवारी व रविवारी झालेल्या जोरदार पावसानंतरही तिसऱ्या दिवशी पोलिस दल मतदान प्रक्रियेच्या बंदोबस्तामध्ये सक्रिय होते.

डॉ. शिसवे म्हणाले, "सर्व पोलिस कर्मचारी, अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावले. कोणीही कर्तव्यात कसूर केला नाही. महिनाभरापासून सुरू असलेली प्रतिबंधात्मक कारवाई व सूक्ष्म नियोजनाची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने झाली. विशेषतः दोन दिवस पाऊस सुरू होता, त्यामध्ये सर्वच कर्मचारी-अधिकारी आज पहाटेपर्यंत संवेदनशील भागात गस्त घालत होते. त्यानंतर पुन्हा साडेसहा वाजता मतदानाच्या बंदोबस्तासाठी दाखल झाले."

"मतदानासाठी मतदार सायंकाळी सहापूर्वी मतदान केंद्रावर पोचले. सायंकाळी सहापूर्वी मतदान करण्यासाठी रांगेत थांबलेल्या मतदारांना टोकन देण्यात आले होते. पोलिसांनी रांगा लावून त्यांना मतदानकेंद्रात प्रवेश मिळवून दिला.," असेही डॉ. शिसवे यांनी सांगितले.

सकाळ – दि. २४ ऑक्टोबर, २०१९

# पुण्यातील गुन्हेगारीमध्ये घट

## एनसीआरबीच्या अहवालातील माहिती; १९ मेट्रो शहरांत १२व्या स्थानावर

**ब्रिजमोहन पाटील :**
सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २३ : काही वर्षांपूर्वी पुण्यातील अट्टल गुन्हेगारांना मोका लावून कारागृहात डांबण्यात आल्याने त्याचे चांगले परिणाम दिसून आले आहेत. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोचा (एनसीआरबी) २०१७ चा अहवाल नुकताच प्रकाशित झाला असून, त्यानुसार २०१७ मध्ये पुणे शहरात गुन्ह्यांची संख्या कमी होऊन वर्षभरात १९ हजार १७२ गुन्हे दाखल झाल्याचे स्पष्ट होत आहे. देशातील १९ मेट्रो शहरांमध्ये गुन्हेगारीत पुणे अकराव्या स्थानावरून बाराव्या क्रमांकावर आले आहे.

'एनसीबीआर'तर्फे दरवर्षी देशातील गुन्हेगारीवर अहवाल प्रसिद्ध केला जातो. मात्र, २०१७ चा अहवाल २०१८ ऐवजी २०१९ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. यामध्ये देशातील गंभीर गुन्हे, फसवणूक, महिला अत्याचार, आर्थिक फसवणूक यासह इतर गुन्ह्यांचे विश्लेषण केले जाते. पुण्यात २०१४ ते १६ या काळामध्ये गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली होती. टोळीयुद्धातून भररस्त्यात अनेकांचे खून झाले. त्याचप्रमाणे साखळीचोरी, जबरी चोरी, घरफोडी, महिला अत्याचार या गुन्ह्यांतही वाढ झाली होती. २०१४ मध्ये पुण्यात २२ हजार ८४ गुन्हे दाखल झाले होते. २०१५ मध्ये त्यात घट होऊन १९ हजार ३३२ गुन्ह्यांची नोंद झाली होती.

पान ५ वर »

### खूनही घटले

पुण्यात २०१६ मध्ये १३० खून झाले होते. टोळीयुद्धातून अनेकांचा खून झाला होता. २०१५-१६ मध्ये पुण्यातील अनेक टोळ्यांच्या प्रमुखांसह त्यांच्या साथीदारांवर मोकाची कारवाई करून त्यांना कारगृहात डांबण्यात आले होते. त्यामुळे २०१७ मध्ये खुनाचे गुन्हे घटून ११० गुन्हे दाखल झाले आहेत. त्यात प्रामुख्याने वैयक्तिक व तत्कालीन कारणावरून रागाच्या भरात झालेले गुन्हे आहेत. खुनाच्या प्रयत्नाचे १६३ गुन्हे आहेत.

> गुन्हेगारांवर केलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईमुळे शहरातील गुन्हेगारांना लगाम बसला आहे. यापुढेही गुन्हेगारी कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील. सुरक्षित व निर्भय पुण्यासाठी पोलिस कटिबद्ध आहेत.
> - डॉ. के. वेंकटेशम,
> पोलिस आयुक्त, पुणे

# ‘संकट तुझ्यावर येण्याआधी...’

## पोलिसांकडून पुणेकरांना दिवाळीच्या शुभेच्छा

पांडुरंग सरोदे : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २६ : वर्षानुवर्षे एखाद्याच्या विनोदाचे साधन किंवा टीकेचा धनी हा पोलिसच ठरतो. कोणत्याही प्रसंगात पोलिस कणखर उभा असतो. पण, त्याची दखल घेतली जात नाही. पोलिसही माणूस आहे, त्यालाही मन, भावना आणि कुटुंब आहे. याचा सगळ्यांना विसर पडतो. नेमका हाच धागा पकडून पुणे पोलिसांनी पुणेकरांना दिवाळीच्या खास व्हिडिओद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत.

अवघी दीड मिनिटाची ही कलाकृती पोलिस कर्मचारी, अधिकाऱ्यांनी स्वतः साकारली आहे. त्याद्वारे ‘दिवस असो वा रात्र, संकट तुझ्यावर येण्याआधी, येईल वर्दीतील तुझा मित्र’ असा खंबीर विश्वास पोलिसांनी दिला आहे. सध्या या व्हिडिओला पुणेकरांची पसंती मिळत आहे.

‘इतरांच्या सेवेत स्वतःला समर्पित करा, तुमचा ‘स्व’ तुम्हाला सापडेल...’ महात्मा गांधींच्या या वाक्याने पुणे पोलिसांचा दिवाळीच्या शुभेच्छा देणारा हा व्हिडिओ सुरू होतो. त्यानंतर महिला पोलिस कर्मचारी, वाहतूक पोलिस, पोलिस उपनिरीक्षक, पोलिस निरीक्षक या पदापर्यंतचे अधिकारी व कर्मचारी व्हिडिओमध्ये आपल्या समोर येतात. ‘एका खाकीत किती रंग दडलेत’ या शब्दातून रक्ताच्या नात्यांइतकेच खाकीचेही नाते दृढ करतानाच, ‘ना सण, ना वार, ना सुट्टी, ना आप्तेष्टांच्या भेटी’ या शब्दांनी पोलिसांच्या वेदना नकळतपणे पुढे येतात. ‘ना वाऱ्याची पर्वा, ना पावसाची भीती’ या शब्दांतून कणखरपणाही या संदेशातून व्यक्त केला आहे.

आर्थिक व सायबर गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी या व्हिडिओची संकल्पना पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांच्यासमोर मांडली. त्यांनी त्यासाठी पाठबळही दिले. त्यानंतर वेगवेगळी पोलिस ठाणी, पथके, विभागातील पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वतः शब्दरचना तयार केल्या. स्वतः त्या चांगल्या पद्धतीने सादर केल्या. त्याला साजेसे बॅकग्राउंड म्युझिक पोलिसांनीच शोधून काढले. त्या व्हिडिओला ‘व्हाइस ओव्हर’ही तितकाच दमदार मिळाला आहे.

> पुणेकर व पोलिस एकाच कुटुंबाचा भाग आहे. आपल्या कुटुंबातील सदस्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी आमच्या पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांनी हा व्हिडिओ बनविला आहे. त्याद्वारे पोलिस व नागरिक यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील.
> – **डॉ. के. वेंकटेशम**, पोलिस आयुक्त, पुणे

# वाहतूक पोलिसांची 'इमेज बिल्डिंग'

## विविध प्रयोग आणि बदलांद्वारे पुणेकरांना कोंडीपासून दिलासा

पांडुरंग सरोदे : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. २७ : दररोजच्या वाहतूक कोंडीमुळे वाहतूक विभाग कायमच टीकेचा धनी होतो; परंतु याच विभागाने गेल्या काही महिन्यांत शहरात वेगवेगळे प्रयोग, उपक्रम राबवून आवश्‍यक बदल घडवित पुणेकरांना दिलासा दिला आहे. ट्रॅफवॉच, चक्राकार मार्ग, बेकायदा पार्किंग हटविणे, संभाजी पूल दुचाकींसाठी खुला करण्यासारखे अनेक उपक्रम, बदलांद्वारे पुणेकरांचे जीवन सुसह्य केले. बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारतानाच नियमपालन करणाऱ्या वाहनचालकांबद्दल 'आभार'द्वारे कृतज्ञता व्यक्त करीत वाहतूक शाखेने 'इमेज बिल्डिंग'वर भर दिला आहे.**



घोले रस्ता : सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी वाहतूक पोलिसांनी चक्राकार वाहतूक सुरू केली. त्यामुळे येथील कोंडीची समस्या सुटली.

गेल्या काही महिन्यांपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे शहराच्या वाहतूकव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला. याबरोबरच अरुंद रस्ते, विकासकामे, सण-उत्सवांमुळेही वाहतूक कोंडीत भर पडते. त्यातूनही मार्ग काढण्यासाठी वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांनी सकारात्मक पद्धतीने प्राधान्य दिले.

### नागरिकांकडून धन्यवाद

संभाजी पुलावरून दुचाकी वाहनांना दिवसा जाण्यासाठी वर्षानुवर्षे बंदी होती. मात्र वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांनी या पुलावरून दुचाकींना ये-जा करण्यासाठी खुला करण्याचा आदेश काढला. त्यांच्या या निर्णयाचे लाखो पुणेकरांनी स्वागत केले. हजारो नागरिकांनी त्याबद्दल आनंद व्यक्त करीत पोलिसांना धन्यवाद दिले.

### राबविलेले विविध उपक्रम

- **आभार :** नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांबद्दल कृतज्ञता
- **प्रिपेड रिक्षा बूथ :** बंद योजना पुन्हा सुरू करून प्रवाशांना दिलासा
- **लोकअदालत :** चालकांवरील प्रलंबित खटले निकाली काढण्यावर भर
- **चक्राकार वाहतूक :** दीप बंगला चौक, घोले रस्त्यावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी उपाययोजना
- **पार्किंगमुक्त रस्ते :** बाणेर रस्ता, कोथरूडमधील बेकायदा पार्किंग बंद
- **जुना बाजार स्थलांतर :** मंगळवार पेठेतील कोंडी फोडण्यासाठी निर्णय

सामना – दि. १ ऑक्टोबर, २०१९

# आता घरबसल्या मिळवा वाहतूक शाखेचे डिस्काउंट कुपन

पुणे, दि. ३० (प्रतिनिधी) – वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्या चालकांना आता घरबसल्या डिस्काउंट कुपन मिळणार आहे. वाहतूक शाखेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या आभार योजनेंतर्गत नागरिकांना वाहतूक नियम पाळा आणि डिस्काउंट कुपन मिळविण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार ज्या वाहनांवर कोणताही खटला अथवा दंडाची रक्कम पेंडिंग नसल्यास संबंधिताला घरबसल्या १० टक्के डिस्काउंट कुपन मिळविता येणार आहे. त्यासाठी mahatrafficechallan.gov.in अथवा payechallan वेबसाइटवर वाहनचालकांना माहिती मिळणार आहे.

वाहन चालविताना नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांना प्रोत्साहन देण्यासाठी आभार योजनेंतर्गत हॉटेल, दुकानांमध्ये १० टक्के डिस्काउंट कुपन देण्यात येते. त्यानुसार मागील काही महिन्यांमध्ये तब्बल ३७ हजार वाहनचालकांना आभार कुपन वितरित करण्यात आले आहे.

## नियम पाळणाऱ्या चालकांचे विभागाकडून कौतुक

आतापर्यंत सिग्नलला थांबलेल्या वाहतूक कर्मचाऱ्याकडून वाहनचालकांना डिस्काउंट कुपन देण्यात येत होते. आता वाहनचालकांना mahatrafficechallan.gov.in अथवा payechallan वेबसाइटवर वाहन क्रमांक टाकून दंड नसल्यास



घरबसल्या डिस्काउंट कुपन मिळविता येणार आहे. वाहतूक विभागाकडून विविध उपक्रम राबवून रस्त्यावरील अपघातांची संख्या कमी करणे, वाहनचालकांना शिस्त लावणे, बेशिस्तांवर कारवाई करणे, शिस्तबद्ध वाहनचालकांचा सन्मान करण्यासाठी प्राधान्य देण्यात येत आहे.

### घरबसल्या असे मिळवा डिस्काउंट कुपन

▮ गुगल अॅपवर mahatrafficechallan.gov.in अथवा payechallan वेबसाइटवर वाहन क्रमांक टाकून दंड नसल्यास घरबसल्या वेबसाइट उघडून त्यामध्ये वाहनाचा क्रमांक समाविष्ट करा. दंड अथवा खटला पेंडिंग नसल्यास वेबसाइटवर डिस्काउंट कुपन पर्याय असून, त्यावर क्लिक केल्यानंतर कुपनकोड मिळेल. संबंधित कुपनाचा कोड दुकान, हॉटेलमध्ये उपयोगात आणता येईल. आभार योजनेत पेटीएम कंपनीनेही सहभाग घेतला आहे. त्याद्वारे एक हजार रुपयांचे डिस्काउंट कुपनही देण्यात येईल.

वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या चालकांना प्रोत्साहन देण्यासाठी आभार योजना सुरू आहे. विशेषतः हेल्मेटधारी दुचाकीस्वार, सिग्नल पाळणारे वाहनचालक, झेब्रा क्रॉसिंग, लेनकटिंग न करणाऱ्यांचे कौतुक करण्यासाठी योजनेंतर्गत डिस्काउंट कुपन दिले जाते. आता **mahatrafficechallan.gov.in** वेबसाइटवर वाहन क्रमांक टाकून पेंडिंग रक्कम नसल्यास संबंधित वाहनचालकांना घरबसल्या ऑनलाइन कुपन मिळविता येणार आहे.

▮ पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा

# Appreciation Letter...

To,
Dr. K. Venkatesham
Commissioner of Police, Pune City

Respected Sir

We would like to take an opportunity to express our heartfelt gratitude for the immense help we received from the Bibwewadi Police Personal. World came crashing down on us when we lost our father and our mother was seriously wounded. It was Police Nayak Mr. Bhosle (6481) who noticed that she was still alive and alerted the family who immediately took her to hospital. Our mother is alive today because of the timely help imparted by the Bibwewadi police.

In the time of grief we were helped by ASI Mr. Mahajan and PC Mr. Yadav with the legal formalities in Sasoon Hospital.

We would always be indebted for the assistance provided by the whole team of Bibwewadi Police. A special word of gratitude especially for PSI Mr. Atul Thorat (for his emotional and overall assistance), PN Mr. Devkute (7546) & PC Mr. Lokhande (has been very helpful while recording our statements and apologized to us in case of delays). The whole team was lead by PI Mr. Kumar Ghadge.

Like every law abiding citizen we used to be scared of police and police stations but our experience with the Bibwewadi Police has completely changed our perception.

We (the sister duo) apart from indebted will always be available and more than happy to be of any help to the Pune Police.

Unfeigned Regards,
Daughters of a doting father

P.S. We would be very happy if this mail would be shared over the social media and other forums but request you not to reveal our identity.


150 women rescued fr[om] sex rackets since Janu[ary]

पोलिसांनी साजरी केली गरिबाच्या घरी दिवाळी

अहमदनगर खुनातील गुन्हेगार गजाआड

खवल्या मांजराच्या विक्रीसा[ठी] आलेल्या तिघांना अटक

दीड कोटींची ब्राउन शुगर जप्त

बुधवार पेठेतील वेश्याव्यवसायावर छापा

बोनस देण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्याला अटक

3 held for possession of pangolin; third case in 10 months

कोकेन विक्री करणारा नायजेरियन अटकेत

बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत

अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या दाम्पत्याला अटक

Cops bring back minor who ran off from home

पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे मतदान शांततेत

पळालेला मुलगा पालकांकडे सुपूर्द

हरवलेल्यांच्या शोधासाठी पोलिसांचा मिसिंग सेल

गुन्हे शाखेच्या विशेष पथकाकडून २२ फरारी आरोपींना अटक

मध्यवस्तीमधील लॉटरी जुगार अ...

दाम्पत्याने एकत्र जीवन संपवायचे ठरविले... ...पण नियतीला त्यांचा निर्णय नव्हता मान्य

स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ती आली पुण्यात

पोलिसांमुळे पालकांकडे पोहोचली सुखरूप परत

लग्नाच्या आमिषाने फसवणारा झाला गजाआड

फसविणारे दोन नायजेरियन जाळ्यात

Crime Branch Unit III nabs duo with drugs worth ₹77L

रिक्षात विसरलेले दागिने मिळाले परत

पोलिसांनी सीसीटीव्हीवरून काढला माग

संघटनांतर्फे महिला पोलिसांचा सन्मान

खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील फरारी पोलिसांच्या जाळ्यात

पोलिस आयुक्तांची [गु]न्हेगारी 'सफाई' मोहीम सुरू

'दामिनी'ने अल्पवयीन मुलीला दिले आई-वडिलांच्या ताब्यात

विधिसंघर्षित मुलां[नी साजरी] केली दिवा[ळी]

[भा]ंडण करून पळालेला मुलगा सुखरूप परत

मोबाईल वेडापायी मुलीने सोडले घर

खून करणाऱ्या म्होरक्यासह पाच जणांना अटक

[फ]सवणूक करणाऱ्याला दिल्लीतून अटक